# शिक्षण विभाग (प्राथमिक)
## जिल्हा परिषद अहिल्यानगर

दुरध्वनी 0241-2353694 फ़ॅक्स 0241-2353694

कार्यालयाचा पत्ता : नवीन प्रशासकीय इमारत, माळीवाडा, अहिल्यानगर - 414001

Email : ednprimary@gmail.com Website: www.eduprimaryanagar.in


जा.क्र.कार्या-4/ 302 /2025 अहिल्यानगर दि. 11 /06/2025

## - परिपत्रक -

प्रति,

मुख्याध्यापक,
जि.प.प्राथ.शाळा......(सर्व)
जि.अहिल्यानगर

**विषय :- शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये जिल्हा परिषद शाळांतील 'मिशन आरंभ' उपक्रमाच्या अंमलबजावणीबाबत . . .**

उपरोक्त विषयान्वये अहिल्यानगर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांमध्ये वर्ष 2023-24 पासून मिशन आरंभ उपक्रमाची अंमलबजावणी केली जात आहे.

❖ **सदर उपक्रमाची उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत -**

1. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.5 वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.8 वी) राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत अहिल्यानगर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे.
2. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत जिल्हा परिषद शाळेतील अधिकाधिक विद्यार्थी निवडले जाणे
3. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.5 वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.8 वी) मध्ये अहिल्यानगर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळेतील पात्र विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे
4. इ.3 री पासून स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे
5. स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करणे
6. स्पर्धा परीक्षांबाबत विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणे

Scanned with OKEN Scanner

7. एकविसाव्या शतकातील कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे (तर्कशुध्द विचार, चिकित्सक विचार, सर्जनशीलता, निर्णयक्षमता)

या उपक्रमामुळे जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश इ.6 वी वर्ष 2025 साठी जिल्हा परिषदेच्या 57 विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालात वाढ झाल्याचे अंतरिम निकालाद्वारे निदर्शनास आले आहे. शाळा भेटी दरम्यान विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास दिसून येत आहे. तसेच मिशन आरंभ परीक्षा मार्च 2024 च्या तुलनेत मार्च 2025 च्या निकालात वाढ झाली आहे. **शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये जिल्हा परिषद शाळांतील 'मिशन आरंभ' उपक्रमाचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.**

➢ **'मिशन आरंभ' -**

1. **इ.3 री, 4 थी, 6 वी व 7 वी साठी** जिल्हास्तरावरुन **तिमाही** सराव चाचणीचे आयोजन केले जाईल.
2. इ.4 थी व 7 वी तील विद्यार्थ्यांसाठी मिशन आरंभ परीक्षा **दि.08 मार्च 2026** रोजी तालुकास्तरावर परीक्षा केंद्र निर्माण करुन घेण्यात येईल.
3. या सराव चाचण्या व **'मिशन आरंभ'** परीक्षेसाठी वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांना यापूर्वी विभागामार्फत दिलेल्या **दिशादर्शिकेनुसार नियमित मार्गदर्शन** करावे. जिल्हा परिषदेमार्फत शाळास्तरावर पुरविण्यात आलेल्या इ.3 री व 4 थीच्या मार्गदर्शक पुस्तिकांचा संदर्भ साहित्य म्हणून वापर करावा. सदर पुस्तिका विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात.

2. तिमाही सराव चाचणीसाठी जिल्हास्तरावरुन प्रश्नपत्रिका पीडीएफ स्वरुपात गटशिक्षणाधिकारी कार्यालयास दोन दिवस आधी ई-मेल द्वारे पुरविल्या जातील. गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून सदर प्रश्नपत्रिका **पीडीएफ स्वरुपात** शाळास्तरापर्यंत पुरविल्या जातील.

3. या सराव चाचण्या चौथ्या शनिवारी दि.28 जून 2025, दि.27 सप्टेंबर 2025 व दि.28 डिसेंबर 2025 रोजी **शाळास्तरावर** घ्यायच्या आहेत.

4. शाळास्तरावरुन चाचणी घेण्याच्या पध्दतीत **लवचिकता** ठेवली आहे. विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकांच्या **छायांकित प्रती** उपलब्ध करुन दयाव्यात किंवा इंटरॲक्टिव्ह पॅनल / बोर्ड / प्रोजेक्टर / एल.ई.डी इ. **डिजीटल साधनांचा वापर** करुन प्रश्नपत्रिका सोडवून घ्याव्यात किंवा शिक्षकांनी त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनेद्वारे प्रश्नपत्रिका सोडवून घ्याव्यात. विद्यार्थ्यांना कोऱ्या उत्तरपत्रिका उपलब्ध करुन द्याव्यात.

5. सराव चाचणी नंतर दोन दिवसांत (सुटटीचे दिवस वगळून) निकाल गटशिक्षणाधिकारी कार्यालयास पाठवावा.

6. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत शाळास्तरावर जतन करुन ठेवाव्यात.

Scanned with OKEN Scanner

7. शाळास्तरावर **निकाल विश्लेषण** करुन आवश्यक ती **उपाययोजना** कराव्यात. जसे अतिरिक्त पूरक मार्गदर्शन, पुनर्अध्यापन, विशेष मार्गदर्शन वर्गाचे आयोजन, सातत्यपूर्णसराव, शिक्षण विभागाच्या वेबसाईटवरील संदर्भ साहित्याचा (मार्गदर्शक पुस्तिका, सराव प्रश्नपत्रिका) वापर करणे इ.

8. मार्च 2026 मधील मिशन आरंभ परीक्षेतील जिल्हा गुणवत्ता यादीतील इ.4 थी व 7 वी च्या प्रत्येकी 500 विद्यार्थ्यांचे पुढील शैक्षणिक वर्षासाठी गुणवत्तेच्या अनुषंगाने ट्रॅकिंग केले जाईल.

- **शिष्यवृत्ती परीक्षा पूर्वतयारी -**

**1.इ.5 वी व 8 वी साठी** जिल्हास्तरावरुन दरमहा सराव चाचणीचे आयोजन केले जाईल. यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना यापूर्वी विभागामार्फत देण्यात आलेल्या दिशादर्शिकेप्रमाणे नियमित मार्गदर्शन करावे.

**2.शाळास्तर सराव चाचणी** -शाळास्तरावर घ्यावयाच्या माहे जून ते सप्टेंबर 2025 सराव परीक्षांच्या जिल्हास्तरावरुन प्रश्नपत्रिका पीडीएफ स्वरुपात गटशिक्षणाधिकारी कार्यालयास दोन दिवस आधी ई-मेल द्वारे पुरविल्या जातील. गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून सदर प्रश्नपत्रिका पीडीएफ स्वरुपातशाळास्तरापर्यंत पुरविल्या जातील.

3. या सराव चाचण्या चौथ्या शनिवारी दि.28 जून 2025,दि.26 जुलै 2025,दि.23 ऑगस्ट 2025 व दि.27 सप्टेंबर 2025 रोजी शाळास्तरावर घ्यायच्या आहेत.

4. शाळास्तरावरुन चाचणी घेण्याच्या पध्दतीत **लवचिकता** ठेवली आहे. विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकांच्या **छायांकित प्रती** उपलब्ध करुन दयाव्यात किंवा इंटरॲक्टिव्ह पॅनल / बोर्ड / प्रोजेक्टर / एल.ई.डी इ. **डिजीटल साधनांचा वापर** करुन प्रश्नपत्रिका सोडवून घ्याव्यात किंवा शिक्षकांनी त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनेद्वारे प्रश्नपत्रिका सोडवून घ्याव्यात. विद्यार्थ्यांना कोऱ्या उत्तरपत्रिका उपलब्ध करुन द्याव्यात.

5. शाळास्तरावरील माहे जून ते सप्टेंबर 2025 सराव चाचणी नंतर दोन दिवसांत (सुटटीचे दिवस वगळून) निकाल गटशिक्षणाधिकारी कार्यालयास पाठवावा.

6. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत शाळास्तरावर जतन करुन ठेवाव्यात.

7. **परीक्षा केंद्र निर्मितीद्वारे सराव चाचण्या** -माहे ऑक्टोबर 2025 ते फेब्रुवारी 2025 च्या मासिक सराव चाचण्या तालुकास्तरावर परीक्षा केंद्र निर्माण करुन घेण्यात येतील. या परीक्षा दि.12 ऑक्टोबर 2025, दि.23 नोव्हेंबर 2025, दि.28 डिसेंबर 2025, दि.18 जानेवारी 2026 व दि.01 फेब्रुवारी 2025 रोजी घेण्यात येतील.

8. सर्व सराव चाचण्यांचे शाळास्तरावर **निकाल विश्लेषण** करुन आवश्यक ती **उपाययोजना** कराव्यात. जसे अतिरिक्त पूरक मार्गदर्शन, पुनर्अध्यापन, विशेष मार्गदर्शन वर्गाचे आयोजन, सातत्यपूर्णसराव,शिक्षण विभागाच्या वेबसाईटवरील संदर्भ साहित्याचा (मार्गदर्शक पुस्तिका, सराव प्रश्नपत्रिका) वापर करणे इ.

Scanned with OKEN Scanner

9. जिल्हास्तरावरुन मिशन आरंभ परीक्षेतील निवडक 500 विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेल्या ऑनलाईन मार्गदर्शन वर्गास गुणवत्ताधारक विद्यार्थी नियमित जॉईन होतील, याची दक्षता घ्यावी. तसेच शिक्षण विभागाच्या वेबसाईटवरील ऑनलाईन रेकॉडेड मार्गदर्शन व्हीडीओ उर्वरित सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश, पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.5वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.8वी) साठी सर्व विद्यार्थ्यांना (दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत पालकांच्या संमतीने) परीक्षेसाठी प्रविष्ठ करावे.

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश, पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.5वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.8वी) व मिशन आरंभ परीक्षा इ.4 थी व इ.7 वी यांच्या वर्ष 2024-25 निकालाच्या तुलनेत वर्ष 2025-26 मध्ये वाढ होणे अपेक्षित आहे. त्यानुषंगाने शाळास्तरावर नियोजन व काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

(आनंद भंडारी भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रत उचित कार्यवाहीस्तव :**

**गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती (सर्व) जि.अहिल्यानगर**

2/- गटशिक्षणाधिकारी यांनी सदर उपक्रमाच्या तालुकास्तरावरील अंमलबजावणीचे संनियंत्रण करावे. इ.5 वी व 8 वीचे वर्ग असलेल्या शाळांच्या मुख्याध्यापक व वर्गशिक्षकांची शिष्यवृत्ती परीक्षा तयारीच्या अनुषंगाने दरमहा आढावा बैठक घ्यावी. तसेच दरमहा इ.5 वी व 8 वीचे वर्ग असलेल्या किमान 4 शाळांना भेट देऊन इ.5 वी व 8 वीचे वर्ग तपासणी करावी.

**विस्तार अधिकारी (शिक्षण),पंचायत समिती (सर्व) जि.अहिल्यानगर**

3/- विस्तार अधिकारीयांनी या उपक्रमाच्या अनुषंगाने कार्यक्षेत्रातील इ.5 वी व 8 वीचे वर्ग असलेल्यासर्व शाळांना दरमहा किमान 2 भेटी देऊन भेट देऊन इ.5 वी व 8 वीचे वर्ग तपासणी करावी व शिक्षकांना मार्गदर्शन करावे. शाळास्तरावर सराव चाचण्यांचे आयोजन, निकाल संकलन, निकाल विश्लेषण, शाळा व्यवस्थान समितीशी समन्वय, जिल्हास्तरावरील ऑनलाईन मार्गदर्शन वर्गाचे कार्यान्वयन व मार्गदर्शन वर्गासाठी विद्यार्थी उपस्थिती टिकविणे, सर्व विद्यार्थ्यांच्या प्रविष्ठतेबाबत आढावा घेणे इ. कामकाज करावे.

Scanned with OKEN Scanner

केंद्रपमुख,पंचायत समिती (सर्व) जि.अहिल्यानगर

4/- केंद्रप्रमुखांनी आठवडयातील किमान 4 तास शिष्यवृत्ती परीक्षेच्या अनुषंगाने अध्यापन करावे.या उपक्रमाच्या अनुषंगाने कार्यक्षेत्रातील इ.5 वी व 8 वीचे वर्ग असलेल्यासर्व शाळांना दरमहा किमान 2 भेटी देऊन इ.5 वी व 8 वीचे वर्ग तपासणी करावी व शिक्षकांना मार्गदर्शन करावे. शाळास्तरावर सराव चाचण्यांचे आयोजन, निकाल संकलन, निकाल विश्लेषण, शाळा व्यवस्थापन समितीशी समन्वय,ऑनलाईन मार्गदर्शन वर्गासाठी विद्यार्थी उपस्थिती टिकविणे, सर्व विद्यार्थ्यांच्या प्रविष्ठते बाबत आढावा घेणे इ. कामकाज करावे.

क्षेत्रीय अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रात शून्य टक्के निकालाची एकही शाळा राहणार नाही याची दक्षता घ्यावी व निकालात वाढ होण्यासाठी केंद्र,बीट व तालुकास्तरावरुन नियोजन व काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. याबाबत जिल्हास्तरावरुन नियमित आढावा घेण्यात येईल.

सदरचे परिपत्रक जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर 20250611160053 या क्रमांकाने प्रसारित करणेत आलेला आहे.

(आनंद भंडारी भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

Scanned with OKEN Scanner